# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

## जाहीर अवाहन

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६४ ते २६८ मधील तरतुदी तसेच शासन संदर्भ विसआ-२०१५/प्र.क्र.३४९/नवि-२०, दिनांक ०५ नोव्हेंबर २०१५ नुसार व त्या अनुषंगाने भिवंडी निजामपूर म.न.पा.ने निश्चित केलेल्या कार्यपद्धती (एस.ओ.पी.) नुसार सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात कार्यक्षेत्रातील अतिधोकादायक व धोकादायक मिळकतीचे सबंधीत प्रभागामार्फत सर्वेक्षण करण्यात आले असून सर्वेक्षणाअंती सी-१, सी-२ए, सी-२बी व सी-३ या प्रवर्गात मोडणाऱ्या मिळकती जाहीर करण्यात आलेल्या आहेत. सदर इमारतीतील रहिवाश्यांना त्यांच्या सदनिका रिक्त करण्याकरीता महानगरपालिकेकडून वेळोवेळी नोटिसाव्दारे कळविण्यात आलेले आहे. तसेच उक्त अधिनियमातील तरतुदी नुसार पोलीस स्टेशनला निर्मनुष्य करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई तसेच राज्य शासनाने धोकादायक मिळकतीबाबत करावयाची कारवाईचे अनुषंगाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार मुळ मालक/ भोगवटदार यांना पुरेशी संधी देवूनही संबंधितांनी इमारत रिक्त करुन पाडण्याची कार्यवाही केली नाही तर या मिळकतीचा विद्युत पुरवठा व पाणी पुरवठा खंडीत करणे व त्यानुसार मिळकती पोलीसांमार्फत निर्मनुष्य करुन पाडण्याची कार्यवाही मनपामार्फत करण्यात येते.

तथापि काही मिळकतीमध्ये अजुनही नागरीक वास्तव्यास आहेत. सद्यस्थितीत पावसाळा सुरू होत असून अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे धोकादायक व अतिधोकादायक इमारतीतील नागरीकांनी त्या इमारती त्वरीत रिकाम्या करुन, निर्मनुष्य करुन, विना विलंब सदर अतिधोकादायक / धोकादायक इमारती स्वतःहुन सुरक्षितरीत्या पाडण्याची कार्यवाही करावी. धोकादायक इमारत कोसळून काही दुर्घटना घडल्यास व त्यात जिवीत व वित्त हानी झाल्यास त्या बाबतची सर्वस्वी जबाबदारी इमारतीमध्ये वास्तव करणाऱ्या संबंधित नागरिकांची तसेच इमारतीचे मालक व भाडेकरू यांची राहील. त्याकरीता महानगरपालिका जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांची जिवित व वित्त हानी टाळण्याच्या दृष्टीने जागरुक राहणे ही नागरिकांचीही जबाबदारी आहे. त्यामुळे आपण सर्वजण जबाबदार नागरिक म्हणून आपआपल्या परिसरातील इमारतींवर लक्ष ठेवून भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने धोकादायक अतिधोकादायक इमारती निर्मनुष्य करून सुरक्षित स्थळी आपण रहिवास हलवून सहकार्य करावे.

**(विजयकुमार म्हसाळ)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**आपत्कालीन परिस्थितीत पुढील दुरध्वनी / Toll Free क्रमांकावर संपर्क साधावा.**

02522-250049

1800 233 1102

**भिवंडी नि. शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील धोकादायक/अतिधोकादायक इमारतींची यादी खालील QR Code व लिंकचा वापर करुन पाहता येईल.**

https://tinyurl.com/mucmavmu